MHJN090006832024

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल दिनांक | : | १२ | ०८ | २०२४ |
| नोंदणी दिनांक | : | १३ | ०८ | २०२४ |
| निकाल दिनांक | : | ०२ | ०६ | २०२६ |
| | | वर्षे | महिने | दिवस |
| | | ०१ | ०९ | २१ |

**<u>भाग ''अ''</u>**

**<u>न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, बदनापूर यांचे न्यायालयात</u>**

**<u>(पिठासीन अधिकारी – श्री. जी. एन. लंघे)</u>**

**(घोषित केल्याचा दिनांक ०२.०६.२०२६)**

**<u>नि.फौ.खटला क्र.१२४/२०२४</u>** **<u>नि.क्र.३३</u>**

| | |
|---|---|
| प्रथम खबरी अहवाल क्र.२६०/२०२४ | दि.०९.०७.२०२४ |
| दोषारोप पत्र क्र.१२६/२०२४ | दि.२८.०७.२०२४ |
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन, बदनापूर,<br>जि.जालना. |

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | :– | महाराष्ट्र शासन मार्फत<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलीस ठाणे, बदनापूर, जि.जालना. |
| **अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ** | :– | श्री.एच.एस.ढगे सहा. सरकारी वकील. |
| | | **विरुध्द** |
| | :– | १. ज्ञानेश्वर सुदाम खरात,<br>वयः २६ वर्षे, धंदाः शेती,<br>२. सुदाम रामभाऊ खरात,<br>वयः ५३ वर्षे, धंदाः शेती, |

| | | |
|---|---|---|
| **आरोपीं** | | ३. मंगल सुदाम खरात,<br>वयः ५० वर्षे, धंदाः शेती,<br>१ ते ३ रा. डावरगाव,<br>ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा.<br>४. हिरा महेश कोरडे,<br>वयः २१ वर्षे, धंदाः घरकाम,<br>५. महेश शिवाजी कोरडे,<br>वयः २४ वर्षे, धंदाः व्यापार,<br>दोघे रा.अंबड चौफुली, जिजाऊ नगर, ता.जि.जालना.<br>६. मिरा लहु घोगडे,<br>वयः २५ वर्षे, धंदाः घरकाम,<br>७. लहु प्रकाश घोगडे,<br>वयः २८ वर्षे, धंदाः शेती,<br>दोघे रा.भाटेपुरी,ता.जि.जालना. |
| **आरोपींतर्फे विधीज्ञ** | :- | श्री.बी.डी.कावळे. |

**भाग ''ब''**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | दि.३१.०५.२०२० च्या २ ते ३ महिन्यांनंतर पासुन. |
| प्रथम खबरी अहवाल तारीख | ०९.०७.२०२४ |
| दोषारोप पत्राची तारीख | २८.०७.२०२४ |
| आरोपींवर दोषारोप ठेवल्याची तारीख | ३०.०४.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ३०.०४.२०२६ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयासाठी ठेवल्याची तारीख | ०२.०६.२०२६ |
| न्यायनिर्णय घोषित केल्याची तारीख | ०२.०६.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | --- |

## <u>आरोपीचा तपशिल</u>

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामिनावर सुटल्याची तारीख | आरोपीने केलेला गुन्हा | दोषी किंवा निर्दोष | शिक्षा ठोठावली | सी.आर.पी.सी. च्या कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्यादरम्यान अटकेचा कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ज्ञानेश्वर सुदाम खरात | -- | -- | कलम ४९८अ, ३२३, ५०४ सह कलम ३४ भा.दं.वि.प्रमाणे | निर्दोष | नाही. | निरंक |
| २. | सुदाम रामभाऊ खरात | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरीलप्रमाणे | निर्दोष | नाही. | निरंक |
| ३. | मंगल सुदाम खरात | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरीलप्रमाणे | निर्दोष | नाही. | निरंक |
| ४. | हिरा महेश कोरडे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरीलप्रमाणे | निर्दोष | नाही. | निरंक |
| ५. | महेश शिवाजी कोरडे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरीलप्रमाणे | निर्दोष | नाही. | निरंक |
| ६. | मिरा लहु घोगडे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरीलप्रमाणे | निर्दोष | नाही. | निरंक |
| ७. | लहु प्रकाश घोगडे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरीलप्रमाणे | निर्दोष | नाही. | निरंक |

## न्यायनिर्णय

(घोषित केल्याचा दिनांक ०२ जून २०२६)

आरोपींवर भारतीय दंड संहितेचे कलम ४९८(अ), ३२३, ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा दाखल आहे.

## अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणेः–

२. फिर्यादी लिला ज्ञानेश्वर खरात हिचे लग्न आरोपी क्र. १ सोबत जाती रितीरीवाजाप्रमाणे दि.३१.०५.२०२० रोजी झाले होते. त्यानंतर ती तिच्या सासरी डावरगाव, ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा येथे नांदण्यास गेली असता आरोपींनी तिला लग्नानंतर दोन ते तीन महिने चांगले नांदविले. त्यानंतर आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस माहेरहुन घर बांधण्यासाठी रक्कम रु.२,५०,०००/– घेवुन ये असे म्हणुन लहान सहान गोष्टी वरुन तिला त्रास देवुन शिवीगाळ करुन मारहान करुन अडीच लाख घेवुन ये अशी सतत मागणी करुन तिचा शारिरीक व मानसिक छळ करुन घराबाहेर हकलुन दिले. त्यानंतर तिने महिला निवारण केंद्र पंचायत समिती येथे तक्रार दाखल केली होती तेथे त्यांच्यात तडजोड झाल्याने ती पुन्हा सासरी नांदण्यास गेली. त्यानंतर फिर्यादीस आरोपी क्र. १ पासुन एक मुलगी झाली. त्यानंतरही आरोपींनी तिला त्रास देणे सुरुच ठेवले. दि.०९.०७.२०२४ रोजीच्या ३ महिन्यांपुर्वी तिने घर बांधण्यासाठी

पैसे आणले नाही म्हणुन आरोपी क्र. १ ने तिला मारहान करुन शिवीगाळ करुन तिला व तिच्या मुलीला तिच्या माहेरी सोडुन दिले तेव्हापासुन ती तिच्या माहेरीच आहे. करीता, फिर्यादीने आरोपींविरुध्द घटनेबाबत रितसर फिर्याद दाखल केली.

**३.** या फिर्यादवरुन पोलीस स्टेशन, बदनापूर, जि.जालना येथे गु.र.क्र.२६०/२०२४ नोंदविण्यात येवून त्याचा पुढील तपास ना.पो. पी.जी.नारियलवाले यांना देण्यात आला. तपासामध्ये त्यांनी साक्षीदारांचे तपासटिपण नोंदविले. आरोपींना न्यायालयात हजर राहण्याची नोटीस दिली. तपासाअंती आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्यांचेविरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

**४.** या न्यायालयाने आरोपींविरुध्द दोषारोप (नि.१७) ठेवला व त्यांना वाचून दाखविला. त्यावर आरोपींनी निवेदन (नि.क्र.१८ ते २४) अन्वये गुन्हा कबूल नसल्याचे सांगून संपरिक्षा करण्याची विनंती केली, त्यामुळे आरोपी क्र.१ ते ७ यांचेविरुध्द प्रस्तुतचे प्रकरण चालविण्यात आले.

**५.** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले फिर्यादी यांचे साक्षीमध्ये आरोपी क्र.१ ते ७ यांचेविरुध्द पुरावा मिळून न आल्याने फौ.प्र.सं. कलम ३१३ अन्वयेचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

६. या कामी उभय पक्षातर्फे करण्यात आलेला युक्तिवाद ऐकता व सादर करण्यात आलेला पुरावा पाहता माझ्या विचारार्थ निघालेले मुद्दे व निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | विचारार्थ मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करु शकले काय की, लग्नाच्या दोन ते तीन महिन्यांनंतर पासुन मौजे डावरगाव, ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा येथे आरोपी क्र.१ हा फिर्यादीचा पती व आरोपी क्र.२ ते ७ हे आरोपी क्र.१ चे नातेवाईक यांनी त्यांचे समान उद्देशाचे पुर्ततेसाठी संगनमताने फिर्यादीकडे रक्कम रुपये अडीच लाख घर बांधण्यासाठी माहेरहून घेऊन येण्याच्या कारणावरुन तिचा शारीरिक व मानसिक छळ केला. त्याव्दारे, त्यांनी भारतीय दंड संहितेचे कलम **४९८(अ)** सह कलम **३४** अन्वयेचा गुन्हा केला आहे? | ...नकारार्थी. |
| २. | अभियोग पक्ष हे सिध्द करु शकले काय की, वर नमूद कालावधीपासून व ठिकाणी आरोपींनी त्यांचे समान उद्देशाचे पुर्ततेसाठी संगनमताने फिर्यादीला मारहाण केली. त्याव्दारे, त्यांनी भारतीय दंड संहितेचे कलम **३२३** सह कलम **३४** अन्वयेचा गुन्हा केला आहे? | ...नकारार्थी. |
| ३. | अभियोग पक्ष हे सिध्द करु शकले काय की, वर नमूद कालावधीपासून व ठिकाणी आरोपींनी त्यांचे समान उद्देशाचे पुर्ततेसाठी संगनमताने फिर्यादीला शिवीगाळ करुन अपमानित केले व सार्वजनिक शांततेचा भंग | ...नकारार्थी. |

| अ.क्र. | विचारार्थ मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | करण्यास प्रवृत्त केले. त्याव्दारे, त्यांनी भारतीय दंड संहितेचे कलम **५०४** सह कलम **३४** अन्वयेचा गुन्हा केला आहे? | |
| ४. | आदेश काय? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

**७.** अभियोग पक्षामार्फत आरोपीवर भारतीय दंड संहिता कलम भारतीय दंड संहितेचे कलम ४९८(अ), ३२३, ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. अभियोग पक्षातर्फे आरोपींवरील गुन्हा सिध्द करण्याकरीता एकुण दोन साक्षीदार तपासण्यात आले. त्यापैकी सा.क्र.१ लिला ज्ञानेश्वर खरात व सा.क्र.२ सांडु जाणकु मिसाळ यांना साक्षीदार म्हणुन तपासण्यात आले.

## मुद्दे क्र.१ ते ३ करीता.

८. याकामी अभियोग पक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे स्वरुप पाहता पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मुद्दे क्र.१ ते ३ चे एकत्रित विश्लेषण करणे सोयीचे होणार असल्यामुळे सदर मुद्दे विश्लेषणाकरीता एकत्रित घेतलेले आहेत.

अभियोग पक्षाने आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी

अभिलेखावर फिर्यादी लिला ज्ञानेश्वर खरात यांना सा.क्र.१ म्हणुन नि.क्र.२९ वर तपासण्यात आले. तिने तिच्या साक्षीमध्ये सांगितले की, आरोपी क्र. १ हा तिचा पती आहे. तसेच आरोपी क्र. २ ते ७ हे तिचे पतीचे नातेवाईक आहेत. तिची आरोपींसोबत किरकोळ गोष्टींवर वाद झाला. त्यानंतर तिने आरोपींविरुद्ध फिर्याद दिली होती. तिने केवळ फिर्यादीवर तिची सही आहे हे मान्य केले परंतु, फिर्यादीमध्ये काय नमूद आहे हे तिला माहित नाही असे कथन केले. साक्षीदार अभियोग पक्षाला सहकार्य करीत नसल्याने सहा. सरकारी वकिलांनी त्यांना न्यायालयाचे परवानगीने सुचनात्मक प्रश्न विचारले. याव्यतिरिक्त विचारलेल्या सर्व सुचनात्मक प्रश्नांना त्यांनी अमान्य केले आहे. याउलट त्यांनी त्यांच्या उलटतपासात हे मान्य केले आहे की, त्यांचा आरोपीं सोबत न्यायालयाच्या बाहेर समझोता झालेला आहे व तडजोडपत्र अभिलेखावर दाखल केले आहे.

९. सा.क्र.२ हे फिर्यादी यांचे वडील असुन त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये फिर्यादी व आरोपींमध्ये काहीही झाले नसल्याचे त्यांनी सांगीतले. सदर साक्षीदार अभियोग पक्षाला सहकार्य करीत नसल्याने सहा. सरकारी वकिलांनी त्यांना न्यायालयाचे परवानगीने सुचनात्मक प्रश्न विचारले. याव्यतिरिक्त विचारलेल्या सर्व सुचनात्मक प्रश्नांना त्यांनी अमान्य केले आहे. याउलट त्यांनी त्यांच्या उलटतपासात हे मान्य केले आहे की, त्यांचा आरोपींसोबत न्यायालयाच्या बाहेर समझोता झालेला

आहे व तडजोडपत्र अभिलेखावर दाखल केले आहे.

**१०.** एकंदरीत अभिलेखावर आलेल्या पुराव्या नुसार असे दिसुन येते की, फिर्यादी व आरोपींचा न्यायालयाबाहेर वाद मिटल्यामुळे आणि फिर्यादी हे अभियोग पक्षास समर्थन करीत नाही तसेच फिर्यादी व आरोपींमध्ये आपसात समझोता झालयाबाबत तडजोडपत्र अभिलेखावर दाखल आहे. फिर्यादी हे सदर केस मध्ये महत्वाचा साक्षीदार असून त्याने अभियोग पक्षाची केस नाकारली आहे. तसेच अभिलेखावर आरोपींविरुद्धचे आरोप सिद्ध होईल असा कोणताही पुरावा आला नाही. त्यामुळे मी मुद्दा क्रं.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविले आहेत.

## मुद्दा क्र ४ करिता

**११.** अभिलेखावर आलेला पुरावा पाहता फिर्यादी यांनी अभियोग पक्षास समर्थन न केल्यामुळे अभिलेखावर आरोपींविरुद्धचे आरोप सिद्ध करु शकले नाही त्यामुळे आरोपी हे आरोपांतून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब मुद्दा क्र. ४ चे निष्कर्शाकरिता मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.**१.** ज्ञानेश्वर सुदाम खरात, **२.** सुदाम रामभाऊ खरात, **३.** मंगल सुदाम खरात, **४.** हिरा महेश कोरडे, **५.** महेश शिवाजी कोरडे,

**६.** मिरा लहु घोगडे व **७.** लहु प्रकाश घोगडे, यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४९८(अ), ३२३ व ५०४ सह कलम ३४ अन्वये पात्र असलेल्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२.** आरोपी क्र.१ ते ७ यांचे पूर्वीचे जामीन बंधपत्र व वैयक्तिक बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

**३.** आरोपी क्र.१ ते ७ यांनी १५ दिवसांच्या आत फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये प्रत्येकी रक्कम रुपये १०,०००/– चे जामीन बंधपत्र व वैयक्तिक बंधपत्र सादर करावे.

स्वा/–
दि. ०२.०६.२०२६ (श्री.जी.एन. लंघे),
बदनापूर न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
बदनापूर.

**भाग ''क''**

**अभियोग पक्ष / बचाव / न्यायालयीन साक्षीदारांची यादी.**

**अ. अभियोग पक्ष**

| क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | लिला ज्ञानेश्वर खरात | फिर्यादी |
| अ.सा.क्र.२ | सांडु जाणकु मिसाळ | साक्षीदार |

**ब. बचाव साक्षीदारं**

| क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| ---- | ---- | ---- |

**क. न्यायालयीन साक्षीदारं**

| क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| ---- | ---- | ---- |

## अभियोग पक्ष / बचाव / न्यायालयीन निशाणी क्रमांकाची यादी

**अ. अभियोग पक्ष**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | नि.क्र.३० | साक्षीदार क्र. १ ची फिर्याद वरील सही |
| २. | नि.क्र.२८ | तडजोडपत्र |
| ३. | नि.क्र.३२ | पुरावा बंद पुरशीस |

**ब. बचाव**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ---- | ---- | ---- |

**क. न्यायालयीन निशाणी क्रमांक**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ---- | ---- | ---- |

**ड. भौतिक वस्तु / जप्त मुद्देमाल**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ---- | ---- | ---- |

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मुळ शब्द न शब्द न्यायनिर्णयाप्रमाणे / आदेशाप्रमाणे जशास तसा खरा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नावः– दिक्षा सं. देशमुख (नि.श्रे.)

न्यायालयाचे नावः– न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, बदनापूर.

न्यायनिर्णय झाल्याची तारीखः–०२.०६.२०२६

अपलोड केल्याची तारीखः– ०२.०६.२०२६

स्वा/–

स्वाक्षरी